# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग-दोन

## गुरुवार, दिनांक २५ फेब्रुवारी,२०२१ / फाल्गुन ६, १९४२ (शके)

**१५.** सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, या सचिवालयाचे कार्यालयीन कामकाज अचूक व जलद गतीने होण्यासाठी तसेच कागदांचा कमीत कमी वापर व्हावा यादृष्टीने आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२१ पासुन महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये नियम स्थगित करण्याबाबतच्या सूचना, विहित कालावधीमध्ये QIS या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार आहेत.

ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये सूचना सादर करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

(१) महाराष्ट्र विधानसभेच्या बैठकीच्या दिवशी महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये सूचना कार्यालयीन वेळेत QIS या संगणकीय प्रणालीद्वारे प्रश्नोत्तराच्या तासापूर्वी एक तास अगोदरपर्यंत स्वीकारण्यात येतील. प्राप्त होणाऱ्या सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे स्वयंचलित सूचना क्रमांक दिला जाईल.

(२) म.वि.स. नियम ५७ च्या सूचना ऑनलाईन पध्दतीने दाखल करण्याकरिता संगणक प्रणालीचा नव्याने होणार असलेला वापर लक्षात घेता केवळ आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये म.वि.स. नियम ५७ च्या सूचना ऑनलाईन पध्दतीसोबत ऑफलाईन पध्दतीनेही स्वीकारण्यात येतील. मात्र त्यापुढील अधिवेशनापासून सर्व सूचना ह्या ऑनलाईन पध्दतीनेच स्वीकारण्यात येतील.

(३) म.वि.स. नियम ५७ अन्वये सूचनेतील विषय हा निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाचा, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश ८ ते १० ओळींमध्ये असणे आवश्यक आहे.

(४) म.वि.स. नियम ५७ अन्वये सूचनेच्या स्वीकृतीबाबत व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचा असेल.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२१**

**राजेन्द्र भागवत**
सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४) संगणक कक्ष.